**कृपया प्रसिध्दीसाठी** **27 एप्रिल 2011**

**श्री.राम नाईक, माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) यांनी वसई येथे बुधवार, 27 एप्रिल रोजी पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन**

-----------------------------------------------------------------------

***डहाणू - विरार - बोरीवलीच्या उपनगरी प्रवाशांची नालासोपारा येथे परिषद***

**बुधवार, वसई** : पश्चिम रेल्वेवरील डहाणू - विरार - बोरीवली पट्टयातील उपनगरी प्रवाशांच्या डहाणू - चर्चगेट लोकल, विरार कारशेड, डहाणू - पनवेल आणि डहाणू - ठाणे लोकल, सर्व लोकल 12 डब्यांच्या, वगैरे मागण्या धसास लावण्यासाठी नालासोपारा येथे रविवार 15 मे रोजी प्रवासी परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही माहिती परिषदेचे अध्यक्ष माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री.राम नाईक यांनी वसई येथे बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

परिषदेसंबंधी अधिक माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले,"वाजपेयी सरकारच्या काळात रेल्वे राज्यमंत्री म्हणून कार्य करीत असताना मुंबई रेल्वे विकास प्राधिकरणाची (एमआरव्हीसी) स्थापना करण्यात येऊन रु.3,125 कोटींचे वेगवेगळे प्रकल्प मंजूर करण्यात आले. हे सर्व प्रकल्प 2007 पूर्वी पूर्ण करण्याचे होते. परंतु पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांच्या पहिल्या मंत्री मंडळातील रेल्वे मंत्री श्री.लालूप्रसाद यादव आणि विद्यमान मंत्री मंडळातील रेल्वे मंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यांनी मुंबईकडे दुर्लक्ष केले, परिणामी त्या प्रकल्पांचा सुधारित खर्च रु.1,376 कोटींनी वाढला असून तो आता रु.4,501 कोटी वर पोहचला आहे. तसेच चार वर्षे जास्त उलटून गेली तरी त्यातील काही महत्त्वाची कामे अजूनही व्हावयाची आहेत."

"दिरंगाई आणि जास्तीच्या खर्चा बरोबरच संतापजनक परिस्थिती ही आहे की याचा सर्वात जास्त फटका डहणू - विरार - बोरीवली पट्टयातील प्रवाशांना बसतो आहे. डहाणू - चर्चगेट थेट लोकल सुरु करण्यासाठी विरार - डहाणू रेल्वे मार्गाच्या रुंदकरणाचा खर्च रु.29 कोटी वरुन रु.50 कोटी म्हणजे रु.21 कोटी जास्त होणार आहे, तर विरार कारशेड आणि यार्डाचा खर्च रु.73 कोटी वरुन रु.226 कोटी म्हणजे रु.153 कोटी जास्त होणार आहे. विरार - डहाणू मार्गाचे रुंदीकरण पूर्ण झाले असल्यामूळे डहाणू - चर्चगेट लोकल अधिक विलंब न लावता सुरु करा अशी मागणी करण्यासाठी रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष श्री.विवेक सहाय यांच्याशी 18 मार्च रोजी दिल्ली येथे तर पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री.कुलभूषण यांच्याशी 10 एप्रिल रोजी प्रत्यक्ष भेटून चर्चा केली. या दोन्ही अधिका-यांना प्रवाशांचा संयम संपत आला असल्याची जाणीव करुन दिली. तथापि डहाणू - चर्चगेट गाडी केव्हां सुरु होईल याचा

निश्चित दिनांक ते सांगू शकले नाहीत. अशीच उपेक्षा बोरीवली - विरार गाड्यांच्याबद्दलही नुकतीच करण्यात आली आहे. 14 एप्रिलपासून चर्चगेट - बोरीवली, चर्चगेट - अंधेरी, चर्चगेट - वांद्रे अशा 106 फे-या वाढविण्यात आल्या आहेत, परंतु चर्चगेट - भाइंदर, किंवा चर्चगेट - विरार अशी एकही नवी फेरी सुरु करण्यात आली नाही. बोरीवली - विरार - डहाणू क्षेत्रातील प्रवाशांच्या जखमांवर मीठ चोळण्याचाच हा प्रकार आहे,"असेही श्री.राम नाईक म्हणाले.

या शिवाय डहाणू - पनवेल, डहाणू - ठाणे अशा नव्या गाडया सुरु करणे, पूर्व पश्चिम जोडणारा विरारचा उड्डाणपूल बांधण्यात होत असलेली दिरंगाई दूर करुन तो लवकर पूर्ण करणे, नायगाव - सफाळा - वाणगाव येथे उड्डाणपूल मंजूर करणे, मीरा - भाइंदर ते डहाणू पर्यंतच्या सर्व स्थानकावर स्वच्छ प्रसाधनगृहे, पिण्याचे पाणी, प्लॅटफॉर्मची उंची वाढविणे, प्लॅटफॉर्मवर संपूर्ण छत बांधणे, अधिक तिकीट खिडक्या सुरु करणे या सारख्या सुविधांची गरज असल्याचेही श्री.नाईक यांनी सांगितले.

वरील सर्व समस्या धसाला लावून सोडविण्यासाठी प्रवासी परिषदेचे आयोजन करण्यात येत असून प्रवाशांनी मोठया संख्येने सहभागी होऊन परिषद यशस्वी करावी असे आवाहन करुन श्री.राम नाईक म्हणाले,"ठरावाच्या माध्यमातून प्रवाशांची सनद (Charter of Demands) तयार करुन पुढील वाटचालीची दिशा ठरविण्यात येईल. त्यासाठी प्रवाशांनी सूचनाही द्याव्यात अशी विनंती आहे."

प्रवासी परिषद रविवार 15 मे रोजी सायंकाळी 5.00 वाजता नालासोपारा पश्चिम येथे बस डेपो शेजारच्या मैदानावर होईल. परिषदेचे उद्‌घाटन विद्यमान आमदार आणि डहाणूचे माजी खासदार ॲड. चिंतामण वनगा करणार असून प्रमुख पाहुणे म्हणून आमदार श्री.विष्णू सावरा, आमदार श्री.संजय केळकर आणि सौ.मनिषा चौधरी उपस्थित राहणार आहेत. परिषदेचे निमंत्रक आहेत :सर्वश्री भाविक सोरठी (डहाणू), मधुकर पाटील (बोइसर),मिठालाल जैन (पालघर), रघुनाथ पाटील (सफाळे), अमोल पिंपळे (विरार), शेखर धुरी (वसई रोड), राजन नाईक (नालासोपारा), केदारनाथ म्हात्रे (नायगाव), नरेंद्र महेता व हेमंत म्हात्रे (मीरा - भाइंदर) आणि बाबाजी काठोळे (ठाणे ग्रामीण). परिषदेच्या कार्यालयाचा पत्ता : श्री. राजन नाईक, नगरसेवक, चंद्रेश गौरव, एस्. टी. डेपोसमोर, नालासोपारा रेल्वे स्टेशन (पश्चिम), मोबाइल : 9225147335

**(कार्यालय सचिव)**